—: प्रेसनोट :— दि.२७/०२/२०२०

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | मुंबई विभाग |
| गुन्हा नोंद क्रमांक | ११/२०२० |
| कलम | ७,१२ भ्र.प्र.अधिनियम १९८८ |
| आरोपीत लोकसेवकाचे नाव व कार्यालय | १) मनिषा राजीव सिंग वय ४७ वर्षे, धंदा — नोकरी, सहाय्यक नगर रचनाकार, मुद्रांक जिल्हाधिकारी अंधेरी तालुका बी.के.सी बांद्रा (पुर्व),मुंबई. रा.ठी ई १/१:२,नेरूळ सी व्हयु को—ऑप. सोसायटी, सेक्टर ६, नेरूळ, नवी मुंबई<br>२) महेश मारूती कट्टीमनी वय ४३ वर्ष रा.ठी. बी /१, वाडीया चाळ,दत्त मंदीर रोड, वाकोला पुलाजवळ सांताक्रुझ पुर्व (खाजगी इसम) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | रु. १,२५,०००/— |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | रु. ५०,०००/— |
| थोडक्यात माहिती | फिर्यादी हे हौसिंग सोसायटी,जमिन खरेदी विक्री सल्लागार म्हणुन काम करतात. फिर्यादी यांना या एका सोसायटीचे नावे जमिन हस्तांतरण करणे करीता सल्लागार म्हणुन नियुक्त केले होते. त्या अनुषंगाने फिर्यादी यांनी दस्तऐवज मुद्रांक जिल्हा अधिकारी, अंधेरी तालुका यांचे कार्यालयात दि. ३०/०१/२०२० रोजी प्रकरण सादर केले होते. सदर प्रकियेतील मालमत्तेचे मुल्यांकन करण्यासाठी मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ च्या कलम ३१ अन्वये अंतरिम आदेश काढण्यासाठी तेथील आलोसे श्रीमती मनिषा राजीव सिंग ( सहाय्यक नगर रचनाकार ) यांनी सोसायटीच्या प्रत्येक सभासदाकडून (प्रत्येकी दोन हजार रूपये) एकुण सभासद संख्या ६७ असुन असे एकुण १,३४,०००/— रू लाचेची मागणी केली होती.<br>फिर्यादी यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक २५/०२/२०२० रोजी ला.प्र.वि., वरळी, मुंबई येथे लेखी तक्रार दिली. दिनांक २५/०२/२०२० रोजी पडताळणीमध्ये लोकसेवक यांनी फिर्यादीकडे तडजोडीअंती रू.१,२५,०००/— लाचेची मागणी करून ती दिनांक २७/०२/२०२० रोजी घेवून येण्यास सांगितले.<br>त्यापैकी दिनांक २७/०२/२०२० रोजी फिर्यादीकडून रू. ५०,०००/— लाचेची रक्कम शासकीय पंचासमक्ष आरोपी खाजगी इसमामार्फत स्विकारताना लोकसेवकास रंगेहात पकडण्यात आले. फिर्यादी यांनी लोकसेवका विरूध्द दिलेल्या तक्रारीवरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभागाकडून गुन्हा दाखल करण्यात येत आहे. |

( वंदना नारकर )
अपर पोलीस उप आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग मुंबई

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्ट्राचारा संबधीत काही माहिती असल्यास अगर लाचप्रतिबंधक मागणाऱ्या लोकसेवकाबददल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबधंक विभाग, मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

संपर्क— लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग ९१, सरपोचखानवाला रोड, वरळी, मुंबई ३०
संकेतस्थळ—acbmaharastra.gov.in
ईमेल— १)acbwebmail@mahapolice.gov.in
२)addlcpacbmumbai@mahapolice.gov.in.
ऑनलाईन तक्रार अर्ज—www.acbmaharastra.net.टोलफ्रि. क्र. १०६४
दुरध्वनीक्र. ०२२ २४९२१२१२ फॅक्स. क्र. ०२२२४९२२६१८, व्हॉटसअप क्र. ९९३०९९७७००